२८४११/१६

परवनगी वर्ष :- २०१३-२०१४
माध्यम :- मराठी
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा** (यादी क्र.७५०)
(माध्यमिक)

जा.क.शिउसं/माध्य-३/१३/प्र.मा./पुवि/२०१३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 14 NOV 2013

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे.

**विषय :- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत.**
**माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालय,सदाशिव पेठ,टिळक रोड,पुणे-३०**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रं.स्वंयअ-२०१३/(८५/१३)माशि-१ दिनांक १५ जून २०१३
२) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं माध्य-३/१२/स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/१३/ २१४१०/१३ दिनांक २८-८-२०१३
३)आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र. जि प/माध्य/स्वंयअर्थ/३४७२/ दिनांक २३.१०.२०१३
४) दिनांक ७.११.२०१३ च्या पाचगणी येथील आढावा बैठक

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे** या संस्थेच्या **माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालय,सदाशिव पेठ,टिळक रोड,पुणे-३०** या माध्यमिक शाळेच्या **इयत्ता ९ वी १० वी (इ.नववी दहावीच्या प्रथम वर्गास)** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठी जुन २०१३ पासून एक वर्षासाठी आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता प्रथम मान्यता देण्यात येत आहे..

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२ नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून **भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.**

३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे

४. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

६. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१०. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

१२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२ अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल

१३ शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २०० व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नविन शाळा /वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

Certified True Copy

HEAD MISTRESS
M.S. Golwalkar Guruji Vidyalaya
Secondary Unit, Pune-30.

A:\C:\Documents and Settings\ed1\Desktop\Shaikh J\pratham manyata.doc